**पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**

**प्रेसनोट**

**2025**

**CB/20/2025**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ११.०४.२०२५**

**''भुषण, लॉजिग अ‍ॅण्ड बोर्डीग, प्लॉट नंबर एमएन १६९, नारपोली, कोन, पनवेल,रायगड, येथे चालणा-या वेश्याव्यवसायातुन सहा पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त,(गुन्हे), नवी मुंबई यांनी पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/श्री पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक १०/०४/२०२५ रोजी त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,''भुषण, लॉजिग अ‍ॅण्ड बोर्डीग'', प्लॉट नंबर एमएन १६९, नारपोली, कोन, पनवेल, रायगड येथील मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकास ३ ते ४ हजार रूपये घेवुन वेश्यागमनासाठी मुली व महिला दाखवुन वेश्या व्यवसाय करीत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली.

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास भुषण, लॉजिग अ‍ॅण्ड बोर्डीग, प्लॉट नंबर एमएन १६९, नारपोली, कोन, पनवेल, रायगड, येथे पाठवले असता बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून पथकाने १९.०५ वाजता लॉजवर छापा टाकला असता त्याठिकाणी सहा महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर किशोर गर्दे याने लॉज मधील महिलांना बनावट ग्राहकास दाखवुन त्यापैकी ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबदला म्हणुन ४०००/- रूपये मॅनेजर किशोर गर्दे यांने बनावट ग्राहक यांच्याकडुन स्वीकारले.

त्यावरुन १) किशोर अशाके गर्दे, वय ३९ वर्ष, (लॉज मॅनेजर), २) अभिलाष कृष्णा शेटटी, वय २६ वर्ष, (वेटर), ३) लोकेश देवराज गौडा, वय ३९ वर्ष, (लॉज चालक) तसेच ४) पाहिजे आरोपी शिवसागर रामप्रकाश गुप्ता, (लॉज चालक) यांनी आपसात संगणमत करून सहा पिडीत महिला यांना नमुद लॉज वेश्याव्यवसायासाठी वापरला असल्याचे आढळून आले.

**म्हणून वरील अटक व पाहिजे आरोपी यांच्या विरूध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिंबंधक कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पनवेल तालुका पोलीस ठाणे करत आहे.**

**सदर गुन्हयात तीन आरोपी यांना आज दिनांक ११/०४/२०२५ रोजी ०६.०८ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक १३/०४/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.**

सदरचे कारवाई मध्ये सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, AHTU , गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/अलका पाटील, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/मांडोळे, पोशि/ठाकुर, पोशि/चव्हाण, मपोहवा/धोनसेकर, मपोहवा/अडकमोल, मपोहवा/ म्हात्रे हे सहभागी होते.

★★★★★★★★★★★